# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 02 June 2025
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०२ जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- भारत जगातलं तिसरं मोठं हवाई क्षेत्र – आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या सभेत पंतप्रधानांची माहिती
- विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी असणं आवश्यक – केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांचं प्रतिपादन
- देशातल्या सहा कोटींहून अधिक शेतकऱ्यांना डिजिटल ओळखपत्रं मिळाल्याची केंद्र सरकारची माहिती
- नागपूर – मुंबई समृद्धी महामार्गावरच्या इगरतपुरी ते आमणे या शेवटच्या टप्प्याचं येत्या पाच तारखेला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

आणि

- आषाढी एकादशीसाठी शेगाव इथून संत श्री गजानन महाराज पालखीचं प्रस्थान

****

बाजारपेठ, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषासाठी वाव आणि व्यापारासाठी खुलं धोरण, यामुळे भारत जगातलं तिसरं मोठं हवाई क्षेत्र असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आय ए टी ए अर्थात आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या ८१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते आज बोलत होते. आंतरराष्ट्रीय सहकार्य, हवामान बदल, आणि जागतिक हवाई वाहतुकीच्या उद्दीष्टांना पुणे नेण्याचं हे व्यासपीठ असल्याचं पंतप्रधान म्हणाले. हवाई क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर झालेल्या सुविधांमुळे येणाऱ्या काळात हे क्षेत्र मोठ्या बदलांचं केंद्र बनेल, असं त्यांनी नमूद केलं. भारत सरकारच्या उडान योजनेचा उल्लेख करत पंतप्रधानांनी, २०१४ पासून देशातल्या हवाई क्षेत्रात झालेल्या बदलांची माहिती दिली.

कालपासून सुरू झालेल्या आय ए टी ए कार्यक्रमाची उद्या सांगता होईल. या कार्यक्रमादरम्यान, भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात झालेल्या उल्लेखनीय परिवर्तनावर आणि देशाच्या सामाजिक–आर्थिक विकासात त्याच्या योगदानावर चर्चा करण्यात आली.

****

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी नुकत्याच झालेल्या आशियाई ॲथलेटिक्स जिंक्यपद स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल भारतीय खेळाडुंचं अभिनंदन केलं आहे. सामाजिक संपर्क माध्यमावरच्या संदेशात त्यांनी, या खेळाडुंच्या उत्तम सादरीकरणावर गर्व असल्याचं म्हटलं आहे.

****

विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकसित शेती आणि समृद्ध शेतकरी असणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केलं. ते आज बिहारमधल्या मोतिहारी इथं शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्याबाबत आयोजित केलेल्या चर्चासत्रात बोलत होते. देशभरात १६ हजार शास्त्रज्ञ थेट शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. उत्पादनात वाढ करणं, उत्पादन खर्च कमी करणं, आणि शेतमालासाठी दर निश्चित करणं यावर ते काम करत असल्याचं कृषीमंत्री म्हणाले. सरकार डाळी, तेलबिया यांच्या लागवडीला प्रोत्साहन देत असून शेती अधिक फायदेशीर करणं हा सरकारचा उद्देश आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं. शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेची सर्वात मोठी शक्ती आहे, असं चौहान म्हणाले.

****

देशातल्या सहा कोटींहून अधिक शेतकऱ्यांची डिजिटल ओळखपत्रं तयार केली आहेत. केंद्र सरकारनं जारी केलेल्या ताज्या आकडेवारीत ही माहिती दिली आहे. या ओळखपत्रांद्वारे शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदी, पशुधन, पिकांची माहिती आणि त्यातून मिळालेल्या उत्पन्नाची नोंद केली जाणार आहे. या ओळखपत्रांचा उपयोग पीकविमा तसंच प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेचा लाभ मिळवण्यासाठी होणार आहे. उत्तर प्रदेशात सर्वाधिक एक कोटी ३० लाख शेतकऱ्यांची ओळखपत्र तयार केली आहेत. तर महाराष्ट्रात ९९ लाख, मध्य प्रदेश ८३ लाख, आंध्र प्रदेश ४५ लाख, गुजरात ४४ लाख, तर राजस्थानात ७५ लाख शेतकऱ्यांची डिजिटल ओळखपत्रं तयार केली आहेत.

****

नागरिकांच्या बदलत्या जीवनशैलीमुळे विविध आजारांचं प्रमाण वाढत असून, अशा आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आधुनिक उपचार पद्धतीसोबत संयमी जीवनशैली आवश्यक आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. नाशिक इथं आज श्री साईबाबा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, हार्ट इन्स्टिट्यूट ॲण्ड रिसर्च सेंटरचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. गेल्या काही वर्षात चांगल्या उपचार पद्धती विकसित झाल्याने भारतीयांचं जीवनमान वाढलं आहे, साईबाबा हॉस्पिटलमधल्या आधुनिक उपचार पद्धतींमुळे रुग्णांना चांगली वैद्यकीय सेवा मिळेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

****

नागपूर – मुंबई समृद्धी महामार्गावरच्या इगरतपुरी ते आमणे या शेवटच्या टप्प्याचं लोकार्पण येत्या पाच तारखेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. इगतपुरी ते ठाण्यातल्या आमणे हा ७६ कीलोमीटर लांबीचा टप्पा आहे. हा टप्पा पूर्ण झाल्यामुळे समृद्धी महामार्गावरुन आता नागपूर ते मुंबई थेट प्रवास करता येणार असल्याची माहिती राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

****

विदर्भातल्या सिकल सेल आणि थायलेमिया ग्रस्त रुग्णांना उपचारांची सोय व्हावी आणि त्यांचे उपचारांसाठी मुंबईवर असलेले अवलंबित्व कमी व्हावे यासाठी भारतीय आयुर्विज्ञान संस्था – एम्स नागपूर इथं बोन मॅरो ट्रान्सप्लांट युनिट सुरू करण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली होती. या संकल्पनेस सकारात्मक प्रतिसाद देत एसटीपीसीने या युनिटसाठी अर्थसहाय्य दिलं आहे. याबाबतच्या सामंजस्य करारावर आज स्वाक्षरी करण्यात आली. या कराराअंतर्गत एनटीपीसी त्यांच्या सामाजिक दायित्व निधी उपक्रमांतर्गत एम्स नागपूरला आर्थिक मदत करणार आहे.

****

द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया – आय सी ए आय नं सप्टेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या सनदी लेखापाल – सीए परीक्षांचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. या परीक्षांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पां जुलैपासून सुरू होणार आहे. ही परीक्षा तीन ते २२ सप्टेंबरदरम्यान होणार असल्याचं ICAI ने सांगितलं आहे.

****

जम्मू आणि काश्मीरमध्ये आजपासून पर्यटन विभागातर्फे सांस्कृतिक आणि सामुदायिक कार्यक्रमांचा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. सतवारी इथं डोगरी फूड फेस्टिव्हलने या उत्सवाची सुरुवात होत आहे. पहलगाम हल्ला, सीमेवरील गोळीबार आणि भारतीय सशस्त्र दलातील शहीदांच्या सन्मानार्थ आज कटरा इथं मेणबत्तीच्या प्रकाशात स्मरण सभा होईल.

****

आषाढी एकादशीसाठी बुलडाणा जिल्ह्यातल्या शेगाव येथून संत श्री गजानन महाराज संस्थान मधून संत श्री गजानन महाराजांची पालखी विठ्ठल नामाच्या जयघोषात आज पंढरपूरकडे रवाना झाली. पालखीसोबत ७०० वारकरी, पताकाधारी, अश्व आणि गजांचा सहभाग आहे. ही दिंडी ३३ दिवस ७२५ किलोमीटरचा पायी प्रवास करत चार जुलैला पंढरपूरला पोहचेल. पालखीचं हे ५६ वं वर्ष आहे.

****

बनावट कागदपत्रांचा वापर करून आखाती देशांमध्ये प्रवास करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चार नेपाळी तरुणांना मुंबई पोलिसांनी अटक केली. ते बिहारमधून भारतात आले होते. प्रत्येक आरोपीनं प्रवास व्यवस्था आणि बनावट कागदपत्रांसाठी एजंटला नेपाळी चलनात अडीच लाख रुपये दिल्याचं उघडकीला आलं आहे. अशाच प्रकारे बेकायदेशीरपणे परदेशात जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहा नेपाळी तरुणांना गेल्या आठवड्यात अटक केली होती.

****

धुळे कृषी विभागाच्या पथकाने धुळे शहरात आज सकाळी खासगी बसगाड्या आणि वाहनांवर छापे टाकून २० लाख रुपये किमतीचं बनावट तसंच राज्यात प्रतिबंध असलेलं कपाशीचं बियाणं जप्त केलं. पथकातल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रात्रभर गस्त घालताना मिळालेल्या माहितीच्या आधारे वेष बदलून ही कारवाई केली. हे बियाणं गुजरातमधून महाराष्ट्रात विक्रीसाठी आणलं जात होतं आणि त्यात बाराशे ते तेराशे पाकिटांचा समावेश होता.

****

कृषी विभागाच्या पथकानं अमरावतीतून प्रतिबंधित एच टी बी टी बियाण्याची अडीच हजार पाकिटं जप्त केली. जप्त केलेल्या या बियाण्यांची किंमत २५ लाख रुपये आहे. गुजरातमधल्या अहमदाबादमधून अमरावतीमार्गे नागपूरला जाणाऱ्या खासगी बसच्या तपासणीत हा साठा आढळून आला. याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास सुरु आहे. यापूर्वी कृषी विभागाच्या पथकानं जिल्ह्यात विविध ठिकाणी अनधिकृत एचटीबीटी बियाण्यासंदर्भात सहा कारवाया केल्या असून, त्यापैकी ५ कारवायांमधे जप्त केलेला माल गुजरातमधून आल्याचं उघडकीला आलं आहे.

****

दहशतवाद विरोधी पथक एटीएसने ठाणे जिल्ह्यातल्या पडघा इथं २००३ च्या मुंबई सेंट्रल आणि मुलुंड बॉम्बस्फोट प्रकरणातला आरोपी, सिमी या बंदी घातलेल्या संघटनेचा माजी सदस्य साकिब नाचण याच्या घरावर छापा टाकला. २०१७ मध्ये शिक्षा पूर्ण केल्यानंतर नाचण पुन्हा दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या संशयावरुन ही कारवाई करण्यात आली. एटीएसने या प्रकरणात सहा संशयितांना ताब्यात घेतले असून सखोल चौकशी सुरू असल्याचं वृत्त आहे.

****

धुळे तालुक्यातल्या सोनगीर इथल्या अनुसुचित जाती आणि नवबौद्ध मुलांच्या शासकीय निवासी शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धेत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावत ११ लाख रुपयांचे पारितोषिक मिळवले. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यातील ९२ शासकीय निवासी शाळांमधून या शाळेने प्रथम क्रमांक मिळवला असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

अकोला जिल्ह्यात बाळापूर-वाडेगाव रस्त्यावर आज भरधाव चारचाकी पुलाचे कठडे तोडून खाली कोसळून झालेल्या अपघातात तीन जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाला. चालकाचं गाडीवरचं नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाला.

****

बीड जिल्ह्यातलं बिंदूसरा धरण पूर्ण भरलं असून, धरणाच्या सांडव्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे. यामुळे नागरिक मोठया संख्येने धरण परिसरात गर्दी करत आहेत. मात्र सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असून, नागरिकांनी धरण परिसरात गर्दी करु नये, पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असून, अचानक पाण्याची पातळी वाढू शकते, त्यामुळे नागरिकांनी धरण परिसरात जाणं टाळावं, असं आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आलं आहे.

****

उन्हाळी सुट्यात होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वेनं पूर्णा – जालना– पूर्णा साप्ताहिक विशेष रेल्वे चालवण्याचं नियोजन केलं आहे. ही रेल्वे पूर्णतः अनारक्षित असेल. परवा एक जून पासून दर रविवारी ही गाडी पूर्णेहून संध्याकाळी पाच वाजता सुटेल आणि रात्री आठ वाजून ५० मिनिटांनी जालन्याला पोहोचेल. परतीच्या प्रवासात ही गाडी पाच जूनपासून दर गुरुवारी सकाळी नऊ वाजता जालन्याहून सुटेल आणि दुपारी साडे बारा वाजता पुर्णेला पोहोचेल.

****